॥ अमेरिकेतील एक अनुभव ॥

" वॉश अँड ड्राय " - बेरी सुपरमार्केट जवळ आम्ही गाडी उभी केली आणि भराभर स्लिपिंग बॅग्ज आणि कम्फ़रटर(गाद्या आणि दुलया) बाहेर काढले. नेहमी प्रमाणे मी सगळ्या गोष्टींबद्दल अनभिज्ञ पण उत्सुक. लाँड्रीचं दार बिचकत बिचकत ढकललं आणि नज़रेला एक काऊंटर आणि बरीच वॉशिंग मशिन्स पडली. काऊंटर आपल्या कडच्या एस. टी. स्टँडवरच्या बूथ प्रमाणे, पण तिथे हसतमुख लिसा बसली होती. बाजुला बोर्ड " वॉशिंग, ड्रायिंग अँड आयर्निंग" . " ही कोण असेल? " - विचार करत मी समोर नज़र टाकली तो सोफ़्यावर सगळी माणसं वरच्या कोपर्यातला टी. व्ही. बघत दाटीवाटीने बसलेली.

क्षणभर आपणही त्यात सामील व्हावं असा मोह झाला पण' हे' ट्रॉलीसकट हज़र झालेच." खूपच मशिन्स आहेत वेगवेगळ्या प्रकारची. आपण कुठे जायचंय? " माझा कार्यतत्पर स्वर।" एक्स्ट्रॉ लार्ज लिहलं असेल तिथे" दुसर्या ट्रॉलीत चिंध्या ला बसवून ' एक्स्ट्रॉ लार्जकडे' आमची वरात निघाली पण दरम्यान वाटेत माझ्या दृष्टीने कुतुहलजनक बरेच स्टॉपस् होते. " साबणाचं मशिन! आपण घेवू या ना. पन्नास सेंटलाच आहे. " " आपण आणली आहे पावडर कागदत बांधून" ' ह्यांनी हतातली छोटीशी पुरचुंडी हलवून दखवली." पण मला मशिन ऑपरेट करायचं आहे " " ओ के." ह्यांनी सरळ पन्नास सेंट माझ्या हातावर टेकवले.

' टाईड' ,' ऑल' ,' टारगेट' साबणांचे वेगवेगळे प्रकार." कुठला घ्यायचा? " पन्नास सेंट टाकले आणि टाईडचं बटण प्रेस केलं. खाडकन टाईडचा छोटा बॉक्स ट्रे मध्ये पडला." आता ऑल घेवूया, अजून दे पन्नास सेंट मला" मला मजाच वाटत होती." खेळ नाहीये हा चल आधी" . जमदग्नीचा अवतार धारण करून' हे' तिथून निघाले. मग काय मी ही मागोमाग. आता चेंज मशिन लागलं. लपवून ठेवलेली एक डॉलर ची नोट बेबी बॅगेतून काढली आणि पटकन मशिन मध्ये सरकवली. ओऽऽऽ धडाधड पंचवीस सेंटची चार नाणी ट्रे मध्ये. मी आता पुढच्या मशिनकडे मोर्चा वळवला. एव्हाना आपण गाद्या धुवायला आलो आहोत याचा मला विसर पडला होता. पण दूरवर नवरोजी सोफ़्यावर बसलेले बघून मी पटकन मशिनमधून चहा घेतला आणि घुटके घेत त्यांच्यापाशी पोचले.

एव्हाना साडेतीन डॉलर्स आणि गाद्या मशिनमध्ये टाकून झाले होते. नवरोजींच्या शेजारी जावून बसले आणि माझी रनिंग कॉमेंट्री सुरू झाली, " ती बाई हँगरला कपडे अडकवतेय. हँगर्स कसे काय तिच्याकडे? " " ड्रायरमध्ये टाकायचे नसतील तिला आणि हँगर्स आपापल्या घरूनच आणायचे असतात" " अच्छा, अच्छा पण इथे एवढी टेबलं कशासाठी, लोकं घड्या करतात का कपडे इथेच? " " हो" ह्यांचं एकाक्षरी उत्तर." या लोकांकडे केवढे कपडे असतील ? किती लाँड्री बॉक्स आणतात एकावेळी; आपल्याकडची दोन-तीन पोती होतील. पंधरा दिवस साठवितात आणि मग आणतात बहुधा" यावेळेस माझ्या कॉमेंट कडे ह्यांनी दुर्लक्ष केलं. पण माझीही चिकाटी दांडगी." ती काऊंटरवरची लिसा तीन वेळा येवून गेली. कपडे मशिन मधून काढतेय सारखी आणि घड्या पण करतेय. आपण सुद्धा तिच्याकडे देवू या, म्हणजे थांबायला नको इथे. नंतर कलेक्ट करू " " तू विचारून ये नक्की तिचं काय काम ते" ह्यांनी परत वाचनात डोकं खुपसलं.

मी लगेच उठले. वाटेत वेगवेगळी मशिन्स बघायची होतीच.' रेग्युलर, मिडियम, लार्ज, एक्स्ट्रॉलार्ज' नावं वाचून शर्ट सिलेक्ट करतोय कि काय असच वाटायला लागलं. कपड्यांचे आकार आणि प्रमाण याप्रमाणे ते साईज होते. हळू-हळू लिसा पर्यंत पोचले." हाऊ मच इज द चार्ज फ़ॉर वॉशिंग, ड्रायिंग ॲण्ड आयर्निंग? " " फ़ाईव्ह डॉलर्स पर लोडिंग ऑफ़ वॉशिंग क्लोथ्स, वन डॉलर पर पीस फ़ॉर आयर्निंग ॲण्ड फ़ाईव्ह डॉलर्स लेबर चार्ज" . ॲण्ड ॲण्ड ची टेप संपली आणि पाच अधिक पाच अधिक एक गुणिले अनेक कपडे असा सगळा हिशोब करीत चाळीस-पन्नास डॉलर्स तिला देण्यापेक्षा तासभर इथे बसलं तर काय बिघडतं असा मध्यमवर्गीय दृष्टीकोन बाळगत मी सोफ़्यावर बसले. " काय झालं? " अजूनही कसलातरी हिशोब करत असल्यासारखा माझा चेहरा बघून ह्यांनी विचारलं." पंचेचाळीस डॉलर्स दर पंधरा दिवसांनी म्हणजे इंडियन करन्सीमध्ये किती याचा विचार करतेय." मीही गंभीरपणे उत्तर दिलं." लिसा चार्जेस? " ह्यांनी हसत-हसत विचारलं आणि एक लखोटा हातात सरकवला.

" काय आहे? " " तुझा सोशल सिक्युरिटी नंबर आणि माहिती. येताना लेटर बॉक्स चेक केला होता. आजच आला आहे नंबर, म्हटलं तुझी' लाँड्री नशा' उतरली की देवू. वाच आता माहिती इथेच बसल्या बसल्या।" थोड्याच वेळात नवरोजींना माहिती देण्याची माझी धडपड सुरू झाली माझी." बरं झालं आपण सोशल सिक्युरिटी नंबर काढला ते सुपरमार्केटस्, बँक, इन्शुरन्स कंपनी सगळीकडे हा नंबर लागतोच. सोशल सिक्युरिटी ऑफ़िस मध्ये आपण भरलेला टॅक्स, मॅरेज डेट, बर्थ सर्टिफ़िकेट, आपल्या नावावर गुन्हा असेल तर त्याचं रेकॉर्ड अशी इत्यभूत माहिती असते असं लिहलं आहे त्यांच्या माहितीपत्रकात. बँकेला काय उपयोग होतो रे ह्या नंबरचा? " " आपल्याकडे फ़ॉर्मवर ओळख, साक्षीदार वगैरेची आवश्यकता असते त्याऐवजी बँक या ऑफ़िसमधून त्या त्या व्यक्तिची सर्व माहिती मिळविते. आपल्याला अपार्टमेंट कॉम्प्लेक्सच्या ऑफ़िसमध्येही हा नंबर विचारलेला, आठवतय? " " हो आणि सुपरमार्केटमध्येही. पण तिथे तर तू नंबर सांगणं नाकारलं होतस." " कारण सोशल सिक्युरिटी नंबर समजल्यावर त्या नंबरचा दुरूपयोग केला जावू शकतो म्हणून।" " पण फ़्रॉड करणं शक्यं आहे? " " आहे कारण आपला फोटो नसतो कार्डवर " " ई, मग काय उपयोग. एवढा नंबर कळला कि संपलच सगळं." माझी ताबडतोब प्रतिक्रिया." बाईसाहेब एवढं सोपं नाहीये ते. त्यांच्याकडे बारीक सारीक सर्व माहिती असते आपल्याबद्दल. फ़ॉर्ममध्ये अगदी आपल्या आईचं माहेरचं नाव-आडनावही नमूद करावं लागतं. याचाच अर्थ फ़्रॉड अतिजवळचीच व्यक्ती करू शकते; आणखी एक मुद्दा, अमेरिकेत आपण अगदी कोणत्याही कोपर्यातून सोशल सिक्युरिटी नंबरद्वारा बँक अकाऊंट उघडू शकतो किंवा इतरत्रही वापर करू शकतो. " " पण अपार्टमेंट कॉम्प्लेक्स, बँक असं कोणीही नंबर सांगून त्या व्यक्तीबद्दल माहिती मिळवू शकतात? तसं असेल तर मग काय मी सुद्धा कुणाचीही महिती मिळवू शकेन." (लगेच ओळखी-पाळखीत कुणाचा नंबर माहिती आहे का याचं चक्र माझ्या डोक्यात सुरू झालं.) " छे ग, एवढं सोपं नाहीये ते. विशिष्ट संस्थाच ही माहिती मिळवू शकतात. प्रथम त्यांना कॉंटेक्ट करावं लागतं आणि उगाच कुणालाही ते माहिती देत नाहीत." " देन ओ के. " ड्रायरमधले कपडे वाळल्याची' बीप' ने सूचना मिळाली आणि तो विषय तेवढ्यापुरतं संपला. पण त्याचदिवशी रात्री ' अनसॉल्व्हड् मिस्ट्री' कार्यक्रमात टि व्ही। वर सोशल सिक्युरिटी नंबरचा

दुरूपयोग पहाण्याचा योग आला.

रिकी जोव्हने टायना विल्यमच्या नावाचं ड्रायव्हिंग लायसन्स कॅन्सल केलं. कारण? आपण दुसर्या स्टेटमध्ये शिफ़्ट होत आहोत हे. सगळं अगदी सहज. कुणालाही संशय न येता झालं. रिकी जोव्ह दुसर्या स्टेटमध्ये गेली, नवीन ड्रायव्हिंग लायसन्स काढलं, अर्थात फोटो स्वतःचा पण नाव व इतर माहिती टायना विल्यम हिची. आता सोशल सिक्युरिटी ऑफ़िसमधून इतर माहिती मिळवायची, कशी? रिकीने टायनाच्या नावाचे बनावट डिव्होर्स पेपर्स सादर केले, स्वतः जावून. टायनाबद्दल बारिक-सारिक माहिती त्यामुळे तिला अगदी सहज मिळविता आली. आता रिकीने टायनाच्या नावे बँक अकाऊंट उघडलं. रिकीला बँकेचं क्रेडिट कार्ड मिळालं आणि हळू-हळू टायनाच्या नावे मोठ्या मोठ्या रकमेची बिलं यायला लागली. न केलेल्या खरेदीची बिलं पाहून टायना संभ्रमित न झाली तरच नवल. बँक, सिक्युरिटी ऑफ़िस, पोलिस सर्वांशी टायनाने संपर्क साधला. रिकी जोव्ह आता फरारी आहे. ' अनसॉल्व्हड् मिस्ट्रीज' मध्ये पोलिसांचं आवाहन आहे - ' इफ़ यू हॅव सीन धिस पर्सन प्लीज़ कॉण्टॅक्ट अस।' " बापरे, काय काय उद्योग करून' फ्रॉड' केलाय ना या रिकीने? " माझ्या आश्चर्यचकित प्रश्नावर ह्यांचं उत्तर तयार होतच, " तुला हवे होते ना सोशल सिक्युरिटी नंबरचे फायदे-तोटे? बरं झालं टि व्ही वरच बघितलस, नाहीतर फ्रॉड बद्दल सांगताना कसा? , का? , केव्हां? , कशाला? अशा ककावलीलाही तोंड द्यावं लागलं असतं मला. आता सचित्र वर्णन बघितलस - थँक्स टू टि व्ही." " माझ्या प्रश्नं विचारण्यावर एवढं काही खिजवून बोलायला नको. दुसरा एखादा नवरा असता तर बायको किती' क्युरियस' म्हणून कौतुक केलं असतं. ए, पण ते जावू दे. मला जी स्टोरी समजली(अमेरिकन उच्चार) ती अशीच होती ना नक्की? " मी रिकी-टायना कथाकथन सुरू केलं आणि नवरोजींनी कपाळावर हात मारत रिमोटने टि. व्ही. चं बटण ऑफ केलं.

पत्रव्यवहाराचा पत्ता,
मोहना प्रभुदेसाई-जोगळेकर
२३८९, मॅकब्राईड लेन, नं. ३६,
पार्क व्हिला अपार्टमेंटस्,
सॅन्टारोज़ा, सीए. ९५४०३,
यू. एस. ए.